# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 13 October 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १३ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची रक्कम टप्प्याटप्प्याने वाढवणार असल्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेप्रकरणी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची राज्य सरकारवर टीका
- माजी राज्यमंत्री बाबा सिद्दीकी यांच्या पार्थिवावर आज मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आणि

- महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत - ऑस्ट्रेलिया सामना

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची रक्कम टप्प्याटप्प्याने वाढवणार असल्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे. नांदेड इथं महिला सशक्तिकरण मेळाव्यात ते आज बोलत होते. या योजनेचे नोव्हेंबर महिन्याचे पैसे लाभार्थी भगिनींच्या खात्यात जमा झाले असल्याचं, त्यांनी सांगितलं. लाडकी बहिण योजनेबद्दल अपप्रचार केल्याबद्दल त्यांनी विरोधकांवर टीका केली. सरकारने महिलांसह युवक, शेतकऱ्यांसाठी राबवलेल्या विविध योजनांची मुख्यमंत्र्यांनी यावेळी माहिती दिली.

खासदार अशोक चव्हाण, आमदार बालाजी कल्याणकर यावेळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात आत्मन ॲपचा शुभारंभ होणार आहे. तसंच बालिका पंचायत संकल्पनेचे लोकापर्ण, केंद्रशासन पुरस्कृत अमृत-दोन अभियानाअंतर्गत पाणी

पुरवठ्याचे बळकटीकरण आणि संलग्नीकरण या कामाचं भुमिपूजन, कै. नरहर कुरुंदकर स्मारक भूमिपूजन कार्यक्रम होणार आहे.

****

मुंबईत चर्नी रोड इथं उभारण्यात येणाऱ्या 'मराठी भाषा भवन'चं भूमिपूजन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी मुंबईत होत असलेलं हे मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावं, असे सांगून भाषा भवनाच्या माध्यमातून मराठी भाषा अधिक समृद्ध आणि प्रगल्भ करण्यासाठी अधिक जोमाने काम करूया, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

नवी मुंबईत वाशी इथं सायन – पनवेल महामार्गावरच्या ठाणे खाडी पूल क्रमांक तीनच्या मुंबई–पुणे या उत्तर वाहिनी मार्गिकेचं लोकार्पण, तसंच रेवस–रेडी सागरी महामार्गावरच्या ७ खाडी पुलांच्या कामांचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज झालं. बृहन्मुंबई महानगरपालिका नियोजित कांजूरमार्ग–भांडूप–विक्रोळी इथल्या रुग्णालयाच्या वास्तूचा भूमीपूजन सोहळाही त्यांच्या उपस्थितीत पार पडला.

****

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा–गोरेगाव मतदार संघातली ७५ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्यानं हा मतदारसंघ सुजलाम्–सुफलाम् होणार आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तिरोडा–गोरेगाव विधानसभा क्षेत्रातल्या धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत ५ हजार २१७ कोटी रुपयांच्या विकासकामांचं तसंच, तिरोडा नगर परिषद आणि गोरेगाव नगर पंचायत क्षेत्रातल्या २०५ कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमिपूजन आज फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

****

देशाच्या राजकारणात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा एक वेगळा दबदबा होता, मात्र सध्याच्या सरकारनं हा नावलौकिक धुळीला मिळवला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केली आहे. राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी ते बोलत होते. राज्य सरकारनं गेल्या दोन तीन महिन्यात अनेक निर्णय घेतले, या निर्णयांची अंमलबजावणी होणं शक्य आहे का, असा सवाल त्यांनी केला. राज्यात सुरक्षेचा बोजवारा उडाला आहे, महिलांवर अत्याचार होत आहेत, राजकीय नेते सुरक्षित

नाहीत मग जनतेच्या सुरक्षेचं काय, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. तर राज्य सरकारनं अनेक महामंडळांची घोषणा केली असली, तरी आधीची महामंडळं कार्यरत आहेत का, हे आधी तपासलं पाहिजे, शासकीय माध्यमातून राजकीय भाषणं होत आहेत, हे अयोग्य आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी केली. दरम्यान, या नेत्यांनी यावेळी 'गद्दारांचा पंचनामा' प्रसिद्ध करत भ्रष्टयुतीविरुध्द आरोपपत्र जारी केलं.

****

माजी राज्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या पार्थिवावर आज मुंबईत शासकीत इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. सिद्दीकी यांची काल गोळ्या झाडून हत्या झाली.

दरम्यान, या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणतीही टोळी पुन्हा सक्रीय होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना दिल्या आहेत.

राजकीय नेत्याची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातली कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे, असा आरोप करत गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

दरम्यान, सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं असून त्यांची कसून चौकशी करण्यात येत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. चौकशी दरम्यान पोलिसांनी आणखी एका संशयिताची ओळख पटवली असल्याचं वृत्त आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सिद्दीकी यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली.

****

भारताच्या पायाभूत सेवा क्षेत्राचा कायापालट करण्यात एक परिवर्तनकारी उपक्रम म्हणून उदयाला आलेल्या पीएम गतीशक्ती बृहद आराखड्याला तीन वर्ष पूर्ण झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. गतिशक्ति उपक्रमानं देशाच्या मल्टीमोडल संपर्कव्यवस्थेला लक्षणीय चालना दिली असून, प्रत्येक क्षेत्रात जलदगतीनं आणि कार्यक्षम विकास साध्य करण्यात मोलाचं योगदान दिलं आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. विविध भागधारकांच्या समन्वयामुळे लॉजिस्टिक्सला चालना मिळाली आहे, विलंब कमी होऊ लागला

आहे आणि अनेकांसाठी नव्या संधी निर्माण होत आहेत, असं त्यांनी म्हटलं आहे. गतिशक्ति उपक्रमाच्या माध्यमातून विकसित भारताच्या स्वप्नाच्या ध्येयपूर्तीकडे वेगाने वाटचाल सुरु असून त्यामुळे प्रगती, नवोन्मेष आणि उद्योजकतेला प्रेरणा मिळत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. २०२१ मध्ये सुरु झाल्यानंतर पी एम गतिशक्ति उपक्रमाअंतर्गत आजपर्यंत विविध मंत्रालयांच्या समन्वयानं १५ लाख कोटी रुपयांचे २०८ पायाभूत प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

****

२६ नोव्हेंबर रोजी संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत, या निमित्ताने केंद्र सरकारच्या वतीनं प्रत्येक गावात संविधान गौरव अभियान राबवण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक आणि संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. प्रत्येक जिल्ह्यात संविधान भवन उभारण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. संविधानात बदल करण्यात येणार असा अपप्रचार काही घटकांकडून होत आहे, या अपप्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन रिजीजू यांनी केलं.

****

वाशिम इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झालं असून, त्याला पूरक अशा वैद्यकीय उपकरणांचा कारखाना वाशिम जिल्ह्यात लवकरच सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज वाशिम इथं तपोनिधी या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. या कारखान्यामुळे ३ हजार युवकांना रोजगार मिळेल, असंही त्यांनी सांगितलं.

****

लातूर जिल्ह्यात उदगीर इथं होणाऱ्या पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे वृतपत्र विद्या विभागाचे माजी प्रमुख, ज्येष्ठ पत्रकार डॉ. रविंद्र चिंचोलकर यांची निवड झाली आहे. मुख्य संयोजक बिभीषण मद्देवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. या संमेलनाचे उद्घाटन म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख यांची, तर स्वागताध्यक्षपदी राज्याचे क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे. उदगीर शहरातल्या रघुकूल मंगल कार्यालयात येत्या २० ऑक्टोबरला हे एकदिवसीय पत्रकार साहित्य संमेलन होणार आहे.

****

कझाकस्तानमध्ये अस्ताना इथं सुरु असलेल्या आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात भारताच्या ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीनं इतिहास रचत कांस्यपदक पटकावलं आहे. आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरीमध्ये पदक मिळवणारी ही पहिलीच भारतीय जोडी आहे. उपांत्य फेरीच्या आज झालेल्या सामन्यात जपानच्या मिवा हरिमोटो आणि मियुउ किहाराया या जोडीनं भारतीय जोडीचा पराभव केला.

****

महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारतीय संघाची लढत ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. संयुक्त अरब अमिरातीतल्या शारजाह इथं आज संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. अंतिम फेरीतील चार संघात स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं अत्यावश्यक आहे.

****

पंढरपूरच्या श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदीरात दर्शनमंडप आणि दर्शनरांग याकरता कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या १२९ कोटी रुपयांच्या प्रस्तावास राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच ही बैठक झाली. यासाठी १३ कोटी इतका निधी वितरीत करण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

****

महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातल्या पर्यावरणस्नेही जवळपास २३ हजार वीजग्राहकांनी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करत पेपरलेस वीजबिलास पसंती दिली आहे. महावितरणच्या 'गो-ग्रीन' उपक्रमात सहभागी झाल्याने या ग्राहकांना वार्षिक २७ लाखांहून अधिक रकमेचा थेट फायदा होत आहे.

****